स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विषयात पीएच.डी. साठी सादर करावयाच्या नियोजित प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र या मासिकातून साधलेला जनसंवाद : एक चिकित्सक अभ्यास

संशोधक

अंतेश्वर चंद्रकांत गायकवाड

मो.नं. 9764292715

मार्गदर्शक

प्रा.डॉ. बालाजी लक्ष्मणराव शिंदे

वृत्तपत्र विद्या विभाग प्रमुख

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,

राणी सावरगावता. गंगाखेड जि. परभणी

मो.नं. 9420176582

सन 2019

अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र या मासिकातून साधलेला जनसंवाद : एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना : अंधश्रद्धा निर्मूलनाचा उदय व विकास

हे जग अधिक सुंदर करणा-या विचारधारांचे आपण पाईक आहोत. योग्य काय आणि सत्य काय याचा शोध घेत घेत माणूस हजारो वर्षांपासून उत्क्रांत होत चाललाय. मानव आणि तो ज्या पृथ्वीवर वावरतोय त्याच्या हिताचा आणि संरक्षणाचा विचार करून त्यासाठी कृतीशील राहणारी विचारधारा अखंडपणे तेवत राहिली आहे. त्या विचारधारेतील अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र हे एक आधुनिक संवादाची विचारधारा आहे, परंतु तमा पासून तेजाकडे वाटचाल करणा-या या संस्कृतीबरोबरच अंधारवाटांनी जाणारी विकृती पण मानवाच्या प्रगतीला झाकाळून टाकताना दिसते. ही विकृती कधी धर्माच्या, कधी जातीच्या तर कधी लिंगभेदाच्या रूपात जगात कुरूपता वाढवताना दिसते. एकेकाळी निरंकुश बनून समाजाच्या हिताचा देखावा करणारी, परंतु प्रत्यक्षात शोषण करणारी धर्मसत्ता जगात राजसत्तेने नियंत्रित केली. राजसत्तेला सुध्दा नियमित करणारी लोकसत्ता समाजाने स्विकारलेली आहे.

स्वातंत्र्य, समता आणि बंधूता या मूल्यांच्या रक्षणासाठी मानवी समाज सज्ज झाले, परंतु प्रगतीचे हे चक्र कधी उलट गती घेईल ते सांगता येत नाही, असे इतिहासात घडले आहे. वर्तमानात ते घडण्याचा धोका निर्माण होताना दिसतो. लोकशाही मूल्यांवर अंकुश ठेवण्यासाठी राजसत्तेवर धर्मसत्तेचा अंकुश हवा असा घोष राज्यकर्त्यांकडून केला जातोय. जातीचा विलय होण्याऐवजी जातीसंघटन हा सुध्दा चिंतेचा व चिंतनाचा विषय बनू पाहत आहे. याचबरोबर जात प्रथेचा जुलूम अजूनही कमी होत नाही.

स्वातंत्र्य, समता, बंधूता व न्याय या भारतीय घटनेने अधोरेखित केलेल्या मूल्यांपासून भारतीय समाज कोसो दूर आहे. जातीय हिंसाचार, धार्मिक कलह, स्त्रियांवरील अत्याचार यांचे प्रमाण चिंता वाटावे एवढे आहे. नव्या अंधश्रद्धेचे पीक फोफावत चालले आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या उद्दिष्टपूर्तीसाठी अघोरी अंधश्रद्धा निर्मूलनाचे जाणीवपूर्वक प्रयत्न करावे

लागणार आहेत यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र मासिकास विधायक भूमिका घ्यावी लागेल.

आज केवळ अंधश्रद्धा विरोधी पुरेसा नाही. जागतिकीकरणाच्या आजच्या संदर्भात एकीकडे विवेक वादाची सखोल तात्विक चर्चा घडविणे निकडीचे झाले आहे, म्हणजे नव्या कार्यकर्त्यांना अंधश्रद्धा विरोधाच्या प्रयोगापलीकडे जाऊन इहवाद, विवेकावाद, धार्मिकतेच्या अतिरेकाविरोधी कोणत्या प्रकारचा व काय विचार करायाचा ते अधिक स्पष्ट होईल. त्याचबरोबर तरूण-तरूणींना आकर्षिक करणा-या नव्या भाषेत नव्या साधनाशी विवेकवादी संवाद अनेक पटीने वाढवावा लागेल. आजही आपल्याकडे बुद्धीप्रामाण्यवाद, विवेकवाद रूजलेला नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे खाजगी जीवन व सार्वजनिक जीवनाची संपूर्ण फारकत आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र या मासिकाने लोकांशी कसा संवाद साधला आहे. या मासिकातून लोकांच्या जिव्हाळ्याचे विषय नियमित प्रकाशित करून त्या माध्यमातून ग्रामीण, शहरी भागातून आधुनिक संवाद साधला जातो आहे.

संशोधन विषयाचे ˙É½K´É :

"अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र या मासिकातून साधलेला जनसंवाद : एक चिकित्सक अभ्यास" या विषयाचा अभ्यास करताना या मासिकाने आजपर्यंत अनेक अंधश्रद्धा निर्मूलन करणारे विषय हाताळले आहेत. अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार हा कष्टकरी जनतेच्या हिताला पुढे घेऊन जाणारा आहे. त्यांना त्यांच्या वास्तव स्वरूपाची ओळख करून देणार असल्यामुळेच तो कष्टकरी जनतेच्या मुक्तीसाठी चाललेल्या वर्गसंघर्षाचाच भाग आहे. चार्वाक, गौतम बुद्ध, भगवान महावीर, महात्मा बसवेश्वर, संत तुकाराम हे थेट महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राम लोहिया आणि कार्ल मार्क्स यांची विचार परंपरा आधुनिक काळात अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीमागील तात्विक बैठक निर्माण करण्यासाठी आधारभूत आहे.

डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी त्यांच्या संपूर्ण लिखानातून आणि भाषणातून अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीचे एक तात्विक स्वरूप पुढे आणले आहे. जगाच्या निर्मितीपासून देव, धर्म, संस्कृती, परंपरा या सर्व गोष्टींची उकल आपल्या कार्यकर्त्यांना व्हावी आणि कार्यकर्ता हा अंतिमत: समग्र परिवर्तनाच्या चळवळीचा भाग व्हावा यासाठी ही तत्त्वज्ञानीय बैठक जाणीवपूर्वक घडवली व अंधश्रद्धा निर्मूलनासाठी आधुनिक जनसंवादाची आवश्यकता निर्माण केली. प्रस्तुत संशोधन विषयाचे ¨É½k´É पुढील प्रमाणे सांगता येईल.

1. जागतिकीकरणाच्या आजच्या संदर्भात एकीकडे विवेकवादाची सखोल iÉÉÎk´ÉEò चर्चा घडवणे निकडीचे झाले आहे.
2. उघडपणे शोषण करणा-या जीवघेण्या अघोरी अनिष्ठ प्रथांना विरोध करणे याविषयी माहिती देणे.
3. वैज्ञानिक दृष्टीकोन ही संकल्पना जनमाणसात रूजवणे त्यासाठी, प्रचार, प्रसार व प्रबोधन करणे.
4. अनिष्ठ, रूढी, परंपरांची विधायक व कठोर चिकित्सा आणि त्याला काल सुसंगत पर्याय देणे ¨É½k´ÉÉSÉ आहे.
5. विवेकी समाज निर्मितीसाठी प्रयत्न यासाठी व्यापक समाज परिवर्तनाच्या चळवळी सोबत सहकार्याची भूमिका घेणे. यासंबंधी माहिती देणे, सर्वसामान्य लोकांची जागृती करणे, अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र या मासिकातून जनसंवादाचे ¨É½k´É रूजविणे हे प्रस्तुत संशोधनाचे ¨É½k´É आहे.

संशोधन विषयाची उद्दिष्टये :

कोणत्याही संशोधनात सुस्पष्ट उद्दिष्टे असावी लागतात व अशी उद्दिष्टे शोधकार्यास दिशादर्शक ठरतात. या संशोधन शोधप्रबंध अभ्यासाची उद्दिष्टये पुढील प्रमाणे नमूद करता येतील.

1. एकविसाव्या शतकातील आधुनिक अंधश्रद्धा निर्मूलन जनसंवाद या संकल्पनेचा अभ्यास करणे.
2. भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मूलन संवाद या संकल्पनेचा आढावा घेणे.
3. अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र या मासिकातून अंधश्रद्धा निर्मूलनाविषयी लोकांशी साधलेल्या संवादाचा अभ्यास करणे.
4. सर्वसामान्य जनतेला अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्याची माहिती व त्यामध्ये त्यांचा सहभाग वाढविणे आणि अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र या मासिकाची भूमिका तपासणे.
5. अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्रातून मांडलेले विषय अभ्यासून त्यामध्ये सुधारणा सुचविणे.

गृहीतकृत्ये :

कोणत्याही सामाजिक संशोधनात गृहीतकृत्यास विशेष महत्त्व असते, “गृहीतकृत्ये म्हणजे संशोधनात विकसित करावयाचे कच्चे निष्कर्ष असतात. त्यामुळे शोधकार्याचा पुढील मार्ग सुकर होतो” असे विचारवंत गुड व हॅट यांनी म्हटले आहे. गृहीतकृत्याच्या उपयुक्ततेची चर्चा प्रा. पु. ल. भांडारकर यांनी ‘सामाजिक संशोधन पद्धती’ या ग्रंथात केली आहे. प्रस्तुत संशोधनात पुढील गृहीतकृत्ये सुनिश्चित करण्यात आली आहे.

1. एकविसाव्या शतकात आधुनिक अंधश्रद्धा निर्मूलन जनसंवादाची एक प्रमुख शाखा म्हणून उदयास येत आहे.
2. वाढती लोकसंख्या, वाढते नवनवीन शहरे व ग्रामीण भागात अंधश्रद्धा निर्मूलनाची जनतेत जागरूकता निर्माण होत आहे.
3. अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्रातून समाजात ज्या अनिष्ठ रूढी, प्रथा व परंपरा आहेत त्यांचे समूळ नष्ट करून विवेकवादी व विज्ञानवादी संवाद लोकापर्यंत योग्य पद्धतीने पोहोचविण्यास मदत होत आहे.

4. अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्रातून प्रकाशित लेखांद्वारे अंधश्रद्धा निर्मूलनाचा जनतेशी थेट आधुनिक जनसंवाद साधला जात आहे.
5. एकविसाव्या शतकातील माध्यमाच्या उपलब्धतेमुळे व विशेषीकरणाच्या संकल्पनेशी अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र हे आधुनिक जनसंवादाचे एक प्रमुख माध्यम बनले आहे.

संशोधन पद्धती :

हा विषय नवीन असल्यामुळे या अभ्यासासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखडा वापरण्यात येईल. पु. ल. भांडारकर म्हणतात की, “संशोधन समस्येची किंवा घटनेची निवड केल्यानंतर गृहीतकृत्य निर्माण करण्यासाठी हा आराखडा अतिशय उपयुक्त ठरतो” त्यासाठी पुढील तीन टप्पे प्रामुख्याने लक्षात घेतले जातील.

अ) साहित्य समालोचन :

सामाजिक संशोधनामध्ये अभ्यास विषयाची पार्श्वभूमी समजावून घेण्यासाठी हा टप्पा महत्त्वाचा असतो. पु. ल. भांडारकर यांच्या मते, “संशोधनकर्त्याने निवडलेल्या विषय क्षेत्राशी संबंधित विषयासंदर्भात साहित्याचे वाचन व मनन हा अन्वेषणात्मक अध्ययनातील एक ¨É½K´ÉESÉÉ भाग होय.” या पार्श्वभूमीवर या अभ्यासामध्ये 30 नवीन ग्रंथाचा आढावा घेतला जाईल. तसेच शोधपत्रिका आणि संकेतस्थळावरील सामुग्रीचा संशोधनासाठी वापर केला जाणार आहे.

ब) सामाजिक अनुभव सर्वेक्षण :

प्रा. भांडारकर यांच्या मते, “अनुभव सर्वेक्षणाचा हेतू जाणकार व्यक्तींच्या अनुभवाचे संकलन करणे व त्याचा शोध कार्यासाठी पूरक उपयोग करून घेणे हा असतो” या अनुषंगाने येथे मराठवाड्यातील 50 अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र वाचकांची नमुना निवड पद्धतीने निवड करून त्यांची पाहणी करण्याचे योजिले आहे.

क) अंतरदृष्टीस चालना देणारे घटक :

हा अन्वेषणात्मक अध्ययनातील तिसरा ¨É½K´ÉÉSÉÉ टप्पा होय. या टप्प्याचे ¨É½K´É सांगताना प्रा. भांडारकर म्हणतात की, “अंतरदृष्टीस प्रेरणा देणारी व गृहीतकृत्ये सुचविणारी उदाहरणे निवडून त्यांचे सखोल अध्ययन करण्याची पद्धतही ज्या विषयक्षेत्रामध्ये समस्यांचे सुस्पष्ट स्वरूपीकरण वा निर्धारण करण्याकरिता पुरेसे मार्गदर्शन उपलब्ध नसते अशा क्षेत्रात कार्य करणा-या शास्त्रज्ञांसाठी उपयुक्त ठरते.” त्यामुळे त्यांच्या अंतरदृष्टीस प्रकट झालेले काही पैलू येथे उदाहरणादाखल घेऊन त्यावर भाष्य करावयाचे आहे. या अभ्यासामध्ये 30 ज्येष्ठ अंधश्रद्धा निर्मूलन समिती कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेऊन त्या आधारे अभ्यासविषयाला पूरक ज्ञान संकलित करावयाचे आहे.

प्रकरण योजना :

या शोधप्रबंधात सहा प्रकरणांचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना : अंधश्रद्धा निर्मूलनाचा उदय व विकास

या प्रकरणामध्ये संवाद या संकल्पनेचा उदय, विकास, वाटचाल, अंधश्रद्धा निर्मूलन जनसंवादाची संकल्पना, स्वरूप, व्याप्ती, विकास, वाटचाल, अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्राचे ¨É½K´É, अंधश्रद्धा वार्तापत्राचे स्वरूप याचा आढावा घेऊन महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मूलन स्थितीविषयी आढावा घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे : साहित्य सर्वेक्षण

या प्रकरणामध्ये संशोधनाचा पूर्व अभ्यास करण्यात येईल व या संशोधनासाठी उपयुक्त अशा 30 ग्रंथाचे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय पातळीवरून वर्गीकरण करून साहित्य सर्वेक्षण करण्यात येईल.

प्रकरण तिसरे : संशोधन पद्धती

या प्रकरणामध्ये संशोधनासाठी वापरण्यात आलेली संशोधन पद्धतीच्या व्याख्यासहित विश्लेषण करून संशोधनासाठीची गृहीतके, संशोधनाची उद्दिष्टये सविस्तरपणे मांडण्यात येतील व त्याचप्रमाणे संशोधनाच्या मर्यादाही सांगण्यात येतील.

प्रकरण चौथे : आशय विश्लेषण

या प्रकरणामध्ये आशय विश्लेषण तंत्राचे ¨É½K´É, उद्दिष्टये व उपयोजन सांगून जानेवारी 2017 ते डिसेंबर 2019 या तीन वर्ष कालावधीतील अंकातून प्रकाशित मजकुराचा विशेष घटकांच्या आधारे तालिका व आलेखाद्वारे आशय विश्लेषणाचा अहवाल मांडण्यात येईल व अनुमाने काढण्यात येतील.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व सूचना

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनातून प्राप्त झालेले ठळक निष्कर्ष मांडण्यात येऊन त्यावरील आधारित सूचना देण्यात येतील.

संदर्भग्रंथ सूची

1. लेले रा. के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे, 2004
2. दाभोलकर नरेंद्र, विचार तर कराल? राजहंस प्रकाशन, पुणे, 1998
3. गर्गे स. मा., समाजसुधारक आणि अंधश्रद्धा, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा 1997
4. धारूरकर वि. ल. मराठी वृत्तपत्रसृष्टीत भारतीय वृत्तपत्रे, पुढारी प्रकाशन, कोल्हापूर, 1980
5. दाभोलकर नरेंद्र, श्रध्दा आणि अंधश्रद्ध, राजहंस प्रकाशन, पुणे, 1996

6. कुलकर्णी एस. के. (संपा), पाऊले पत्रकारितेची, नानासाहेब परूळेकर सकाळ चॅरिटी ट्रस्ट, पुणे, 2001

7. रॉजर्स एव्हर्ट, सिंघल अरविंद, इंडिया फेसिंग इन्फॉर्मेशन रव्हलुलेशन, सेज प्रकाशन, नवी दिल्ली

8. मंडपे प्रमोदिनी, वैज्ञानिक दृष्टिकोन, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा, 2013

9. पाटकर प्रदीप, भुतबाधा: मनोविकासर आणि अंधश्रद्धा, महाराष्ट्र निर्मूलन समिती, सातारा, 1997

10. कोठारी सी. आर., रिसर्च मेथड्स ऑण्ड टेक्निक्स, प्रकाशक, व्ही. एस. जोहारी, वाईली इस्टर्न लि., नवी दिल्ली, मे 1990

11. डॉ. भांडारकर पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, प्रकाशक: महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर

12. डॉ. संत दु. का., शोध विज्ञानकोश- साधन संदर्भ ग्रंथ, प्रकाशक, पुणे विद्यार्थी गृह, प्रकाशन, सदाशिवपेठ, पुणे, प्रथम आवृत्ती, 1985

13. डॉ. काचोळे दा. धो. सामाजिक संशोधन पध्दती, कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद, 1993

14. भांडारकर आणि विल्कीनसन मेथडॉलॉजी ॲण्ड टेक्निक्स ऑफ सोशल सायन्स रिसर्च, हिमालया, नागपूर

15. घाटोळे रा. ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 2003

16. Dr. Baldev Shai, Challenges to Print Media, Mass Media, 2001, Publication Diviosion, Govt. of India, 2001

17. Dr. Frezer Bond, An Introduction to Journalism, Macmilan Publication, London

18. Person Karls, The Grammer of Science, Third Edition, Part First, A & C Blank, London, 1911

संशोधक **मार्गदर्शक**

अंतेश्वर चंद्रकांत गायकवाड **प्रा.डॉ. बालाजी लक्ष्मणराव शिंदे**